Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

# पेशवेकालीन खानदेशातील प्रशासन : एक दृष्टीक्षेप

**सौ. जया यशवंत बाविस्कर,**
**प्राध्यापक,**
**आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे**

**प्रस्तावना :**

खानदेशास पूर्वी शेऊणदेश या नावाने ओळखले जात असे. यादव घराण्यातील राजा 'शेऊणचंद्र' याने खानदेशावर राज्य केले. शेऊणचंद्राच्या नावाने या प्रदेशाची ख्याती सर्वत्र पसरली. या प्रदेशाचे शेऊणप्रदेश हे नाव, फारुकी सुलतानच्या 'खान' या उपाधीवरुन 'खानदेश' असे रुढ होईपर्यंत प्रचलित होते. असे या खान्देशात पेशवेकालीन प्रशासनाची छाप होती.

**खानदेशातील राजकीय परिस्थिती :**

दिल्लीचा सुलतान फिरोझशहा तुघलक याच्या सैन्यात मलिक राजा अहमद हा सेवेत होता. त्याने मलिक अहमद यास खानदेशातील थाळनेर आणि करंदा प्रदेशाची जहागिरी बक्षीस म्हणून दिली. त्याने लवकरच तुघलक घराण्याचे वर्चस्व झुगारुन दिले व खानदेशमध्ये फारुकी घराण्याचे राज्य स्थापन केले. थाळनेर येथे आपली राजधानी स्थापन केली. (इ.स. १३८२) खानदेशवर फारुकी सुलतानांनी इ.स. १३८२ ते इ.स. १६०० पर्यंत राज्य केले. इ.स. १६०१ मोगल बादशहा अकबराने आसिरगडावर आक्रमण केले आणि फारुकी घराण्याचा सुलतान बहादूरशहा याचा पराभव करुन खानदेशावर मुघलांची सत्ता प्रस्थापित केली. त्यानंतर खानदेश मुघल साम्राज्यातील एक सुभा म्हणुन गणला जाऊ लागला. या सुभ्यावर बादशहा अकबराने राजपूत्र डॅनियाल यांची नियूक्ती केली. त्यामुळे खानदेशाला डॅनियल प्रदेश 'दानदेश' म्हणून ही ओळखले जात होते. इ.स. १७५२ पर्यंत खानदेशावर मोगलांचे वर्चस्व होते. पेशवा नानासाहेबांच्या कारकिर्दीत मराठ्यांनी निजामाच्या सैन्याचा पराभव केला. त्यामुळे निजाम मराठ्यांना शरण आला आणि त्यातूनच इ.स. १७५२ मध्ये मराठे-निजाम यांच्यात भालकीचा तह घडून आला. या तहानुसार निजामाने मराठ्यांना गाळणा, संगमनेर आणि खानदेशचा प्रदेश देण्याचे मान्य केले. अशा प्रकारे मराठ्यांनी खानदेशचा प्रदेश मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आणला. या प्रदेशावर इ.स. १८१८ पर्यंत मराठ्यांची सत्ता होती. इ.स. १८१८ मध्ये मराठा सत्तेचा अस्त होवून महाराष्ट्रावर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. खानदेशही ब्रिटीशांच्या साम्राज्यात विलीन करण्यात आले. अशा प्रकारे खानदेशावर ब्रिटींशाची सत्ता प्रस्थापित झाली.

**खानदेशातील पेशवेकालीन प्रशासन :**

राज्यकारभार सुरळीत चालावा या दृष्टीने पेशव्यांनी मराठा राज्याची विभागणी केली होती. त्या विभागांना सुभा असे म्हटले जात असे. गुजराथ, कोकण, कर्नाटक आणि खानदेश असे सुभे मराठा साम्राज्यात होते. सुभ्याची विभागणी सरकार या विभागामध्ये केली जात असे. खानदेशात त्या काळी एकूण सहा सरकार होते. त्यात प्रामुख्याने ब्रिजागड, आशेर, नजरबाद, हंडीया, गाळणा आणि बागलाण इ.

सरकारनंतर परगणा हा विभाग असे व परगण्यानंतर महाल हा विभाग असे.

**सरसुभ्यातील अधिकारी :**

सुभ्याचा कारभार सुरळीत चालावा म्हणून सुभ्यात अनेक अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येत असे. त्यात प्रामुख्याने सरसुभा, दिवाण, फडणीस, कारकून इत्यादी अधिकारी वर्ग असत.

सरसुभा : - सरसुभा हा सुभ्याचा प्रमुख असे. खानदेशामध्ये त्याला फक्त प्रशासनात्मक स्वरुपाचे कार्य करावे लागत असे. त्याचे अनेक प्रकारचे कामे करावी लागत असत. त्यात प्रामुख्याने- १) आपल्या विभागात शांतता ठेवणे. २) जास्तीत जास्त जमीन लागवडी खाली आणणे. ३) सुभ्यातील जनतेची काळजी घेणे इ. त्याला या मोबदल्यात १०,०००/- रु. पगार मिळत असे. त्याला मदत करण्यासाठी अनेक अधिकारी असत.

सरसुभ्यावर पेशव्याचे नियंत्रण असे. इ.स. १७६५ मध्ये नारो कृष्ण खानदेशचा सुभेदार म्हणून होता.

मामलेदार हे पद प्रतिष्ठेचे होते. मामलेदाराला सरकारातून पालखीसाठी खर्च मिळत असे. मामलेदाराला आपल्या प्रांतात शांतता व सुव्यवस्था ठेवणे, जमीन लागवडीसाठी आणणे, गुन्हेगारांचा बंदोबस्त करणे इत्यादी कामे त्यास करावी लागत असे. त्याचे प्रमुख कार्य म्हणजे शेतसारा वसुली करणे व वर्षाच्या शेवटी पुण्यास पेशवे दरबारात जावून जमाखर्च सादर करावे लागत असे. इ.स.१७९५-९६ मध्ये नंदुरबार परगण्याचा मामलेदार हरी गोविंद हे होते. त्यांना तिन हजार रुपये वार्षिक वेतन होते.

मामलेदारानंतर परगण्याचा प्रमुख कमाविसदार असे. कमाविसदाराला दरवर्षी पेशवे दरबारातून सनद मिळत असे. कमाविसदाराची कामे सर्व साधारणपणे मामलेदाराप्रमाणेच होती. कमासविसदाराला कमाविसीसाठी १-२ गांवापासून ते पूर्ण परगण्यापर्यंतची गावे असत. ही गावे कमी-जास्त करण्याचा अधिकार सरकारला होते. कमाविसदाराला सनद देतांना त्याचबरोबर आजमासपत्रही देण्यात येत असे. त्या आजमासपत्रात त्या परगण्याचे वार्षिक अंदाज पत्रक दिलेले असे.

**खानदेशातील वतनदार :**

सुभ्याचा कारभार सुरळीत चालण्यासाठी सुभ्यामध्ये पगारी अधिकाऱ्यांबरोबर काही वतनदारही असत. त्यात प्रामुख्याने सरकानुनगो, कानूगो, देशमुख, देशपांडे, पाटील, कुळकर्णी, चौगुला, शेटे, महाजन इत्यादी वतनदार असत.

अशा प्रकारे पेशवेकाळात खानदेशातील प्रशासन व्यवस्था होती.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. टी. टी. महाजन : खानदेशचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास (इ.स. १३८२-१८१८), पुणे- १९९८.
२) डॉ. पी. डी. जगताप : खानदेश इतिहास : जळगांव, १९९७.